ISSN 2278-3954 Saptahik Nagara

साप्ताहिक नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. _____

पत्ता _____

_____

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)

NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. २३ जुलै २०१९

आला पाऊस पाऊस

गुरुजनांनी लाविला लळा.....

।। मुक्तक ।।
प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७
(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

आयुष्याच्या रस्त्यावर प्रत्येकाला असंख्य माणसे भेटतात.या प्रत्येक व्यक्तीचा आपल्यावर काही ना काही परिणाम होत असतो. हा परिणाम दृश्य किंवा अदृश्य स्वरुपात होत असतो. माझ्यावर लहानपणी प्रभाव टाकणाऱ्यांपैकी आमच्या गावातले कारभारी जिभूंचे चिरंजीव दादा गुरुजी हे एक होते. माझे शालेय जीवन सुरु होण्यापूर्वीच्या काळात त्यांनी मला खूप काही दिले. माझी शाळा सुरु होण्याच्या काळात ते डी.एड.करीत होते. त्यांच्या प्रशिक्षण काळातीतल प्रात्याक्षिके ते जणू काही माझ्यावर इम्प्लीमेंट करीत होते. माझी ते सतत विचारपूस करायचे...अनेक नवीन गोष्टी सांगायचे....शिक्षण काय असते..? त्याने माणसाचा काय फायदा होतो..? असे सारे ते मला समजावून सांगायचे...काय वाचावे..? काय पहावे..? काय करु नये..? अशा गोष्टी मला ते सांगायचे... आजूबाजूच्या गावांना होणाऱ्या गट संमेलनासाठी ते मला सायकलीवरुन घेवून गेलेले मला आठवते...त्यांना माझ्याविषयी काय वाटायचे, ते मला आजही माहीत नाही. पण मी शाळेत जाण्याच्या वयाच्या असतांना त्यांनी त्यावेळी मला दिलेली पुस्तके...केलेले संस्कार माझ्यात रुजले...मला लहानपणी जे काही शाळेविषयी आकर्षण वाटू लागले...त्यात दादागुरुजी उर्फ डी.के.सुर्यवंशी ही एक मुख्य प्रेरणा होती, हे मात्र नक्की!



या प्रेरणेतूनच मी शाळेत जाण्याचे वय होण्यापूर्वीच शाळेत जायला लागलो. एक वर्ष तर मी शाळेत नाव नसतांनाही बसत असे...याच काळात दादा गुरुजींनी मला वाचनासाठी काही पुस्तके आणून दिली होती. मी ती पुन्हा पुन्हा वाचत असे...त्यातील थोरांचे विचार...देशभक्तीपर वचने आणि गाणी माझी तोंडपाठ झाली होती. पुढच्या वर्षी माझे नांव पहिलीत घातले..तेव्हा मला शाळा आणखीनच हवीहवीशी वाटू लागली. आमच्या पहिलीला वर्गशिक्षक असलेले टी.झेड.बागुल गुरुजी नव्याने आलेले होते. आमचा वर्ग मारुतीच्या देवळात भरायचा. एके दिवशी बागूल गुरुजींनी एक ते शंभरपर्यंत पाढे लिहावयास सांगितले. सर्व मुलांनी हातात पाट्या घेतल्या. पचापच थुंकत सर्वांनी पाटीवरील आधीचा मजकूर पुसला. आपापल्या परीने पाटीवर रेषा ओढल्या. बागूल गुरुजी म्हणाले, ''आता मी म्हणेल त्याप्रमाणे तुम्ही माझ्या मागून म्हणायचे आणि पाटीवर लिहायचे आहे.''

आम्ही मुले सावध पवित्र्यात पाटी व पेन्सील घेऊन बसलो. बैलगाडीची शर्यत सुरु होण्यापूर्वी गाडीवान हातातली शेल-जोते आणि काकड्यावर नजर ठेवून बसतो तसे !

बागुल गुरूजींनी विशिष्ट तालात सुरु केले.

'' एक ऽऽ एकाचाऽ,''तसे आम्ही म्हणू लागलो.

''एऽऽक एऽऽ का ऽऽ चा ऽ.''

''दोन ऽऽ दोनाचाऽ...''

तसे आम्ही गुरूजींची री ओढू लागलो.

''एकावरऽऽ एक अकराऽ...'' गुरूजी.

आम्ही तोंडाने म्हणत पाटीवर उतरवू लागतो.

''दोनावर ऽऽ एक ऽ एकवीस..'' गुरूजी पुढे जात राहिले...आम्ही मुले त्यांचे अनुकरण करीत पाटीवर जमेल तसे लिहीत राहिलो. माझा लिहिण्याचा वेग नकळत वाढत गेला. माझे पाटीवरचे लेखन पुढे गेले. माझे प्रत्यक्षातले पाढेलेखन पुढे गेल्यामुळे गुरूजींच्या पाठीमागे आणि इतर मुलांसोबत म्हणणे मला अवघड झाले. यामुळे माझे तोंड बंद झाले...ही बाब वर्गभर नजर ठेवणाऱ्या गुरूजींच्या लक्षात आली. ते म्हणाले,

''तू काय रेऽऽ म्हणत नाहीत..?''

मी घाबरलो. त्यांच्या मागे म्हणावे तर...पाटीवर पाढे-लेखनात मी पुढे गेल्याने तसे शक्य नव्हते. त्यांची नजर आता माझ्यावर खिळल्याने पुढचे लिहिणेही बंद होते. मी म्हणत नाही.. आणि लिहितही नाही. हे पाहून ते माझ्या दिशेने येतील असा रागरंग दिसू लागला... भीतीने माझी गाळण उडाली.

मी हुंदके देत रडायला सुरुवात केली. इतर मुले माझ्याकडे पाहायला लागली. 'मला एकदम असे काय झाले..?' अशा नजरेने सर्वजण माझ्याकडे पाहू लागले...गुरुजी जसजसे माझ्याकडे येत होते...तसे तसे माझे हुंदके वाढत होते... गुरूजी जवळ आले....त्यांनी माझी पाटी हातात घेतली...मी नव्वदीत उजळणी लिहीत होतो. त्याचवेळी गुरूजी व इतर मुले साठीचे पाढे लिहीत आणि म्हणत होते...माझी पाटी पाडून गुरूजींच्या चेहऱ्यावरचे आश्चर्य लपून राहिले नाही. ते म्हणाले, ''का रे..रडतोस..?''

माझे हुंदके आणखीन वाढले...

''वेडा कुठला..'' म्हणत गुरूजींनी पुन्हा सुरुवात केली.

''सहावर ऽऽ पाच ऽ पासष्ट..''

आता मला लिहायला संधी नव्हती. इतरांबरोबर राहिलो नाही याची

(गुरूजनांनी लाविला लळा पान १५ वर)

(गुरूजनांनी लाविला लळा पान १४ वरून)

काहीशी खंत मनात होती. पण मी इतरांपेक्षा पुढे आहे...इतरांपेक्षा वेगळा दिसतोय..याचे प्रतिबिंब बागुल गुरूजींच्या डोळ्यात मला दिसत होते...!

बागुल गुरूजींच्या मनात माझ्याविषयीची वेगळी आपुलकी जाणवलेली मला त्या दिवशी दिसली. माझी कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेतल्यानंतर ते मला अधिकच जिव्हाळ्याने समजून घेऊ लागले. डी.के.सुर्यवंशी गुरूजींनी लावलेल्या छोट्याशा रोपाला बागुल गुरूजींनी येता-जाता खत-पाणी देणे सुरू केले. त्यामुळे अगदी पहिली-दुसरीपासूनच मला अध्ययनाची आणि शिकण्याची प्रचंड गोडी निर्माण झाली. मला आजही आठवते. ज्या तल्लीनतेने मी प्राथमिक शाळेत अध्ययनमग्न व्हायचो, त्याचे मला आजही आश्चर्य वाटते. अगदी गणितातील अवघड प्रकरणेही वर्गात शिकवण्याआधी माझी आत्मसात झालेली असायची.

रॉकेलवर चालणाऱ्या मंद दिव्याचा प्रकाशात गणिताचे पुस्तक मी अतिशय एकाग्रतेने वाचत असे. ते वाचतांना आणि समजून घेतांना मला आत्यंतिक उच्च कोटीचा आनंद मिळत असे. रात्री झोपण्यापूर्वी मी अभ्यास करुन सारे आत्मसात केलेले असे. मग वर्गात पुढे कधीतरी बागुल गुरूजी ते प्रकरण शिकवायला घ्यायचे...त्यांच्या शिकविण्याला माझा प्रतिसाद पाहून ते आश्चर्यचकित व्हायचे. माझे मनापासून कौतुक करायचे...हा सारा प्रकार आठवला की वाटते की ते दिवस थांबवता आले असते तर? काळ कोणासाठी थांबत नाही. मग हे शालेय जीवन कोठेतरी साठवून ठेवता आले असते तर..? आयुष्यासाठी योग्य वाट दाखविणाऱ्या या गुरुजनांनी अध्ययनाची जी गोडी लावली...वाचनाचा जो लळा लावला....त्याच पायाभरणीवर पुढे माझा भविष्यातला अध्ययनातला आणि शिक्षणाचा मळा फुलत राहिला. त्यामुळेच माझ्यासाठी वाचन, अध्ययन,पुस्तके, ग्रंथ माझा जीवनाधार बनला...त्यातून अवर्णनीय असा आनंद मला प्राप्त करता आला!

■■■

(वनस्पतीशास्त्राचे संशोधक पान ८ वरून)

असे म्हटले आहे की, मुंग्या वारुळातून बाहेर पडतील, बेडकांचे विशिष्ट आवाजात ओरडणे, सूर्याची आकाशातील विशिष्ट स्थिती, चंद्र, ग्रह, तारे यांची स्थिती पाहून पाऊस पडेल की नाही, केव्हा पडेल हे कळते. या ग्रंथातून धान्य बीजांचा संग्रह, त्यांचे संरक्षण, शेतीविषयक पद्धती आणि व्यवहार इत्यादिंचे ज्ञान मिळते.

धन्वंतरी निघंटु – हा संस्कृत भाषेतील ग्रंथ अकराव्या शतकात लिहिला गेला. मात्र ह्यात ग्रंथकाराचा उल्लेख मिळत नाही. निघण्टु हा एक प्रकारचा शब्दकोश असतो आणि तो एखाद्या शास्त्रीय ग्रंथाच्या शेवटी दिलेला असतो. त्यामुळे प्रस्तुत कोशात ग्रंथकाराचे नांव नसावे.

या कोशात जवळ जवळ ३७३ द्रव्य म्हणजे वनस्पतींचा निर्देश केला आहे. हा ग्रंथ सात गटात विभागलेला आहे. ते गट असे – १) गुडुच्यादि-गुळेवल २) शतपुष्दादि, ३) चंदनादि ४) करवीरादि – कण्हेर इ. ५) आक्रादि ६) सुवर्णादि ७) मिश्रकादि या ग्रंथाचा लेखक म्हणजे – कुशल वैद्याने वनस्पतींच्या उत्तम ज्ञानासाठी तेथे राहणारे लोक, अरण्यातील लोक, तेथील जाती-जमाती आणि सामान्य लोक यांची मदत घ्यावी.

राजनिघण्टु – या ग्रंथाची रचना अकराव्या शतकात झाली. या ग्रंथाची ''निघण्टु राज'' आणि ''अभिधान चिंतामणी'' अशीही नांवे आहेत. काश्मीरमधील ईश्वरसुरी ह्याचा मुलगा नरहरी या ग्रंथाचा कर्ता असून हा संदर्भग्रंथ आहे. इतर प्रमुख ग्रंथात न आढळणाऱ्या सर्पक्षार, कर्पूरतैल इत्यादि औषधांचा ह्यात निर्देश आढळतो. ह्यात तेवीस वर्ग आहेत.

शार्ङ्धर पद्धती – शार्ङ्धर पद्धती हा ग्रंथकोश असून तो शार्ङ्धर याने लिहिला आहे. तेराव्या शतकात बुंदेलखंडात (शाकंभी) येथे राणा हम्मीद राज्यकर्ता होता. त्याच्या दरबारातील एक विद्वान म्हणून शार्ङ्धरचा उल्लेख सापडतो. ''शार्ङ्धर पद्धति'' या ग्रंथात बरेच विषय आहेत. उदा. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि तत्त्वज्ञान इत्यादी. या ग्रंथातील उपवन विनोद या प्रकरणात १)वृक्षवैभव २) निरनिराळ्या वृक्षांची लागवड करण्यासाठी जमिनीची निवड ३) वनस्पतींचे वर्गीकरण ४) बीज व रोपांच्या लागडीची पद्धत ५) पाणी पुरवठा ६) विहिर खाण्यासाठी जमिनीचे परीक्षण ७) वनस्पतींच्या पोषण पद्धतीविषयक नियम ९) वनस्पतींचे सौंदर्य यांचे विवेचन केलेले आढळते.

सुरपाल – सुरपाल हा इ.स.च्या तेराव्या किंवा चौदाव्या शतकात होऊन गेला असावा. या विषयी कालनिर्णयात मत भेद आहेत. काहींच्या मते तो सातव्या किंवा दहाव्या शतकातील असावा.

भावमिश्र – बंगालमध्ये इ.स.च्या सोळाव्या शतकात 'भावमिश्र' नांवाचे वनस्पती शास्त्रज्ञ होऊन गेले. त्यांनी ''भावप्रकाश निघण्टु'' या नांवाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे असे वैशिष्ट्य आहे की, अलिकडच्या काळातील पुदिना, आलूकंद (बटाटा), गरिजर (गाजर) या वनस्पतींविषयी यात चर्चा केली आहे. दुसरे असे की, लेखकाने मातीच्या गुणधर्माचे विस्तृत वर्णन केले आहे. मातीचे प्रकार व त्यांची विशिष्ट धान्यांसाठी योग्यता व विशिष्ट प्रकारच्या रोपांसाठी उपयोग व हेतु सांगितला आहे.

भावमिश्र हे अकबराच्या दरबारातील खास वैद्य होते. युनानी औषधांचा विचार करणारे ते भारतीय प्रथम वैद्य होते.

■■■